IMPACT FACTOR 5.473(SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Journal
ISSN 2455-4375

# .भारतीय अर्थव्यवस्थेवर जागतिकीकरणाचे वेगवेगळ्या क्षेत्रांवर परिणाम

**डॉ. सुनिता निठूरी रविदास**
कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय
जवाहरनगर, ठाणा पे.पंप, भंडारा–४४१९०६
मो. क्र. ९५११८४७५१३, ९६७३७७४८७१
ईमेल–sunitaravidas8@gmail.com

---

**गोषवारा :**

भारताने आयातीवरील कर कमी करावे, उपभोग्य वस्तूंच्या आयातीवर घातलेली नियंत्रणे बाद करावीत. भारत हा उपभोक्ता आधारावर १.१४ बिलीयन लोक आहेत. मात्रात्मक निर्बंध दुर करावेत असे जागतिक व्यापार संघटना (W.T.O.) भारतावर दबाव टाकीत आहे. कृषी क्षेत्र हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे लोकांना अन्न आणि पोषण पूरवण्यातच इतकेच कृषी क्षेत्रांचे कार्य नाही तर त्यामुळे उद्योगांना कच्चामालाचा पूरवठा आणि निर्यात व्यापारातही ती महत्तवाची भूमीका बजावत आहे. साल २००० पर्यंत ७० टक्के लोकांना रोजगार दिला आणि सरल घरेलू उत्पादनात ५९ टक्के योगदान कृषी क्षेत्रांनी दिले आहे २००१ पर्यंत शेतीवर आधारीत असलेल लोकसंख्या ५८ टक्के आली आहे तर GDP मध्ये शेतीचा वाटा २४ टक्क्यांवर आणि २००६–०७ मध्ये २२ टक्क्यांपर्यंत घसरण दिसून आली. याचा परिणाम असा झाला की दरडोई उत्पन्न कमी होऊन शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपणा वाढत आहे. २००६ साली आलेल्या पंचवार्षिक योजनेच्या दृष्टीकोनातून बघीतले तर दहाव्या योजनेच्या कालावधीत मासेमारी आणि वनीकरण कृषी GDP दर २ टक्के पेक्षा कमी राहील.

आर्थिक सर्वेक्षणात २००६–०७ साली शेतीच्या वाढीच्या घसरणीची कारणे वेगवगेळी सांगितलेली आहे कमी गुंतवणूक, खतांच्या वापरातील असमतोल कमी, बियाणे बदलण्याचे दर, विकृत प्रोत्साहन धोरण आणि पिक काढणीनंतरचे मुल्यवर्धन ही समस्या कायम असते.

**बीजशब्द :** भारत, जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, Globalization, Foods, Capital, World Trade, Organization, Liberalization.

---

**प्रस्तावना :**

जागतिकीकरण अथवा वैश्वीकीकरण अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे प्रादेशिक संप्रेषण दळणवळण (वाहतुक) आणि जागतिक व्यापाराचा नेटवर्क (जाळे) एकत्र आलेले आहेत. १९९० च्या दशकाला सुरुवात होताच भारतीय अर्थव्यवस्थेला मोठे धोरणात्मक बदल अनुभवास आले. नविन आर्थिक सुधारणा ज्याला उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण असे म्हटले जाते.

भारतीय अर्थव्यवस्थेत नवीन आर्थिक सुधारणा आणण्यासाठी जुलै १९९१ मध्ये भारत सरकारने नविन आर्थिक धोरण जाहीर केले. या धोरणात उद्योग, सार्वजनिक क्षेत्र, राजकोषीय धोरण, किंमत धोरण यांच्याशी संबंधित धोरणात्मक उपायांचा समावेश जागतिकीकरणात येतो.

जागतिकीकरण म्हणजे व्यापारी, वित, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, राहणी, शासन, समाज, व्यवस्था, संस्कृती अशी सर्व प्रकारच्या क्षेत्रांमधून होत राहणारे रुपांतर होय असे

म्हणता येईल.जागतिकीकरणाचा संबंध सर्वसाधारणपणे आपल्या देशाची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडणे, सुरु झालेल्या अर्थिक बदलांचा परिणाम झाला आहे.

वर्तमान परिस्थितीतीत जागतिकीकरणाने मागील १५ वर्षात एक नविन शिखर गाठलेले आहे आताच्या आधुनिक काळात भौगोलिक सिमा कोणत्याही प्रकारच्या जागतिकीकरणाशिवाय विचार करु शकत नाही. जागतिकीकरणातून संपूर्ण जगाची आर्थिक प्रगती करणे हे नव्या युगाचे उद्दिष्ट आहे. सरकारी उद्योगांच्या वित्तीय गरजा भागविण्यासाठी वाढत्या प्रमाणात कर्जाची उभारणा करावी लागली त्यामुळे खाजगी उद्योग मागे पडू लागले, अशा विविध कारणांमुळे सरकारची उत्पादन क्षेत्रांकडे दुर्लक्ष करायला सुरुवात झाली. १९७० च्या दशकात दुष्काळ, भाववाढ, बेकारी अशा अनेक संकटांना तोंड दयावे लागले व यावेळी राजकोषीय व मौद्रीक धोरणे अयशस्वी झाले व यातूनच बहूराष्ट्रीय कंपन्या वाढल्या व यातूनच जागतिकीकरणाला वैश्वीकीकरणाला सुरुवात झाली.

**व्याख्या :** आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रांना व्यापून राहणारे आहे.

**आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी :**

''जागतिकीकरण म्हणजे वस्तू, सेवा व आंतरराष्ट्रीय भांडवलप्रवाह, अतिजलद व प्रसरण पावणारे तंत्रज्ञान ह्यांचे वाढते प्रमाण तसेच विविधता ह्यांच्या साहाह्याने जगातील देशांचे सतत वाढत जाणारे परस्परावलंबित्व होय.

**जागतिकीकरणाची गरज?**

- जागतिकीकरण हे एक लहान जग आहे.
- सामान्य लोक जागतिकीकरणाच्या जवळ आलेले आहेत.
- जग हे वेळ आणि जागेच्या संपर्कात आलेले आहे.
- वस्तू व सेवा आणि नवनविन कल्पना एका क्षणात जागतिक पातळीवर पसरतात.
- जागतिकीकरणाने लोकांची क्रयशक्ती वाढून त्याच्या जीवनमानाचा दर्जा उंचावतो.
- जागतिकीकरणामुळे आधुनिक तंत्रज्ञान व्यवस्थापन कौशल्य, सुधारीत उत्पादन ह्या गोष्टी देश कंपन्यांना उपलब्ध होतात.
- विदेशी भांडवली गुंतवणुकीसाठी अर्थव्यवस्था खुली केली जाते.
- नफ्याची क्षमता वाढविण्याच्या दृष्टीकोनातून आयातीवरील जकात कराचे प्रमाण कमी करणे.

**जागतिकीकरणाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम :**

भारत हा जागतिक व्यापार संघटनेच्या संस्थापक (W.T.O.) सदस्य आहे. त्यामुळे तिच्या प्रत्येक निर्णयाचे पालन करणे हे भारताचे कर्तव्य आहे ह्याचे भारताच्या अर्थव्यवस्थेवर वेगवेगळ्या क्षेत्रांवर जे परिणाम दिसून आलेले आहे यावर चर्चा करुया.

**जागतिकीकरणाचे विविध क्षेत्रांवर परिणाम :**

**१) भारतीय उद्योग क्षेत्रांवर परिणाम :**

भारताने आयातीवरील कर कमी करावे, उपभोग्य वस्तूंच्या आयातीवर घातलेली नियंत्रणे बाद करावीत. भारत हा उपभोक्ता आधारावर १.१४ बिलीयन लोक आहेत. मात्रात्मक निर्बंध दुर करावेत असे जागतिक व्यापार संघटना (W.T.O.)भारतावर दबाव टाकीत आहे.

भारताने प्रामाणिकपणे सिमाशुल्क कमी केलेले आहे. भारतातीलभांडवली वस्तू उद्योगांना विदेशांमधून आदेश न मिळाल्यामुळे बरेच नुकसान झाले देशातील उद्योगांना उत्पादन शुल्क, विक्रीकर, चुंगीकर भरावे लागतात. परंतू आयातीत वस्तू ह्या भारतीय बाजारपेठेत शुल्क न लावता येतात याचा परिणाम भारतीय उद्योगांवर प्रतिकुल परिणाम दिसून येतो. २००३ अगोदर भारताकडून सर्व प्रतिबंधात्मक नियम हटविण्यात आले त्यामुळे भारतीय बाजारपेठा विदेशी मालांनी ओसंडून वाहू लागल्या.

भारतात मोठ्या प्रमाणावर उपभोक्ता वर्ग आहे, भारतात तिसऱ्या क्रमांकावर जागतिक दुरसंचार बाजारपेठ आहे, मोबाईल उपभोक्ता वर्ग १९९६ मध्ये ३ लाख आणि २०१३ मध्ये ९ करोड इतकी संख्या वाढली आहे. भारताचा विचार केल्यास जागतिकी करणामुळे अनेक स्थानिक तसेच परकीय कंपन्यांचे नवनविन उद्योगधंदे सुरु झाले. उदा. फोर्ड, हुंडई या कंपनीचे कारखाने किंवा आय.टि.सी., हिंदुस्थान लिव्हर, कोकाकोला, पेप्सी वगैरे परकीय देशातील कंपन्यांशी स्पर्धा करण्यासाठी देशातील उद्योगांमध्ये सुधारणा होण्यास सुरुवात झाली.

जागतिकीकरणामुळे विकसीत देशातील आधुनिक तंत्रज्ञानाची विकसनशील देशात आयात होते. त्याचा परिणाम तंत्रज्ञानाचा वापर करुन विकसनशील देश आपली उत्पादकता वाढवून आर्थिक प्रगतीचा वेग वाढवतात.

**२) जागतिकीकरणाचा पर्यावरण आणि नैसर्गिक संसाधनावर होणारा परिणाम :**

जागतिकीकरणामुळे आपल्या जीवनशैली राहणीमान यावर दुरगामी परिणाम झालेला आहे. यामुळे नविन तंत्रज्ञान दळणवळणात सुधारणा आणि नविन संस्कृती, कल्पना विचार याचा प्रवेश सर्व सामान्य लोकांच्या जिवनात झालेला आहे. तसेच विकासाचे मार्ग ही खुले झालेले आहे.

जागतिकीकरणामुळे काही दृढ परिणाम सुध्दा दिसून येतात यापैकी प्रमुख म्हणजे या सर्वांचा परिणाम पर्यावरणावर दिसून आलेला आहे. जागतिकीकरणामुळे उत्पादनांचा वापर मोठ्या प्रमाणात विचार न करता वाढलेला आहे, वाढत्या वापरांमुळे पर्यावरणीय चक्रांवर त्याचा परिणाम दिसून येत आहे. वस्तूंच्या वाढत्या उपयोगामुळे उत्पादनात वाढ होऊन नवनविन कारखाने सुरु झाले आहे. ज्यामुळे पर्यावरणावर त्याचा ताण वाढलेला आहे. जागतिकीकरणामुळे कच्चामाल आणि अन्नपदार्थ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्याचे प्रमाणही वाढले. पूर्वीचे लोक स्थानीक पातळीवर निर्माण झालेले अन्न वापरत होते परंतू जागतिकीकरणामुळे जन सामान्य लोक परदेशात उत्पन्न झालेल्या उत्पादनाचा वापर करतात.

या उत्पादनाची वाहतूक करतांना जेवढे इंधन वापरले जाते त्यामुळे पर्यावरणीय प्रदुषणात वाढझालेली दिसून येते. ध्वनी प्रदुषण तसेच लॅडस्केप, विमानातून वाहतूक याचा परिणाम असा दिसून येतो की उत्सर्जित होणाऱ्या वायुमुळे ओझोनचा थर कमी झालेला आहे. औद्योगिक कचरा जहाजांवरुन लादून महासागरात टाकला जातो अनेक घातक रसायने समुद्रात पसरतात व त्याचा परीणाम पर्यावरणावर दिसून येतात.

**३) जागतिकीकरणाचा कृषी क्षेत्रांवर होणारा परिणाम :**

भारताचे चौथ्या क्रमाकांचे भांडवलीकरण आहे परंतू जागतिकीकरणानंतर शेतीत काही प्रमाणात सुधारणा झालेली आहे. GDP मध्ये भारतीय शेती क्षेत्रांच्या १७ टक्के वाटा आहे. भूमीहीन कुटूंबे मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रांवर आधारीत शेतमजूर जर चांगल्या प्रकारचे उत्पादन झाले नाही व त्यांचे कर्ज जर वाढले तर आत्महत्या करायला भित नाही.

कृषी क्षेत्र हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे लोकांना अन्न आणि पोषण पूरवण्यातच इतकेच कृषी क्षेत्रांचे कार्य नाही तर त्यामुळे उद्योगांना कच्चामालाचा पूरवठा आणि निर्यात व्यापारातही ती महत्तवाची

भूमीका बजावत आहे. साल २००० पर्यंत ७० टक्के लोकांना रोजगार दिला आणि सरल घरेलू उत्पादनात ५९ टक्के योगदान कृषी क्षेत्रांनी दिले आहे २००१ पर्यंत शेतीवर आधारीत असलेल लोकसंख्या ५८ टक्के आली आहे तर GDP मध्ये शेतीचा वाटा २४ टक्क्यांवर आणि २००६—०७ मध्ये २२ टक्क्यांपर्यंत घसरण दिसून आली. याचा परिणाम असा झाला की दरडोई उत्पन्न कमी होऊन शेतकऱ्यांचे कर्जबाजारीपणा वाढत आहे. २००६ साली आलेल्या पंचवार्षिक योजनेच्या दृष्टीकोनातून बघीतले तर दहाव्या योजनेच्या कालावधीत मासेमारी आणि वनीकरण कृषी GDP दर २ टक्के पेक्षा कमी राहील.

आर्थिक सर्वेक्षणात २००६—०७ साली शेतीच्या वाढीच्या घसरणीची कारणे वेगवगेळी सांगितलेली आहे कमी गुंतवणूक, खतांच्या वापरातील असमतोल कमी,बियाणे बदलण्याचे दर, विकृत प्रोत्साहन धोरण आणि पिक काढणीनंतरचे मुल्यवर्धन ही समस्या कायम असते.

भारतांतील सकल देशांतर्गत उत्पादन विकास दर (GDP) २०२० साली भारताचा GDP वाढीचा दर ७.१९ टक्के होता २०१९—२० तुलनेत १२.०१ टक्के घसरण दिसून येते.

**भारताचा जीडीपी वाढीचा दर**

| वर्ष | जीडीपी वाढ (टक्के) | वार्षिक बदल (टक्के) |
|---|---|---|
| २०१० | ८.५० | ०.६४ |
| २०११ | ५.२४ | —३.२६ |
| २०१२ | ५.४६ | ०.२२ |
| २०१३ | ६.३९ | ०.९३ |
| २०१४ | ७.४१ | १.०२ |
| २०१५ | ८.०० | ०.५९ |
| २०१६ | ८.२६ | ०.२६ |
| २०१७ | ६.८ | —१.४६ |
| २०१८ | ६.५३ | —०.२६ |
| २०१९ | ४.०४ | —२.४९ |
| २०२० | ७.९६ | —३.९२ |
| २०२१ | ८.९ | ०.९४ |
| २०२२ | ७.५ | १.४ |

याप्रमाणे मागील १३ वर्षाच्या GDP दराची माहिती सादर केलेली आहे.

भारत हा विकसनशील अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. शेती ही भारतीय अर्थव्यवस्थेची जननी आहे कारण त्याचा प्रभाव प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या अर्थव्यवस्थेच्या इतर क्षेत्रांवर दिसून येतो.

**निष्कर्ष :—**

- भारतात ग्रामीण भागातील जागकरणाला मुख्य अडथळा म्हणजे ग्रामीण भागातील गरिबी, कर्जबाजारीपणा, भ्रष्टाचार जसेच्या तसेच आहे.
- उदारीकरण धोरणाचे भारतीय कृषी अर्थव्यवस्थे मध्ये प्रभुत्व दिसून येते.

- जागतिकीकरणाची भूमिका आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वाणिज्यासाठी महत्वाची आहे परंतू आपल्या देशाची अर्थव्यवस्था त्यासोबत सोयीस्कर होणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**


- भारतीय अर्थव्यवस्था– निती आयोग, प्रा. बी. एल. जिभकाटे, विश्व पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर, २०२१
- भारतीय अर्थशास्त्र– डॉ. प्रकाश देहचीवाल, विश्व पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर, २०१६ (पान क्र. ४५५–४६५).
- भारतीय अर्थशास्त्र– डॉ. जी.न. झामेर, पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, २०१६ (पान क्र. ३१३–३४४)
- http://articlefibve.2fashion.com, Jan.2008.
- www.ijsr.net, v.lurne5issuelo, 2016.
- www.garph.co.ok, V.5, lNog. 1 Sep. 2016.
- ayushyadav@legalserviceindia.com